# ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा

(लोपामुद्राकृत लक्ष्मीस्तोत्र व हयग्रीव–अगस्त्य संवादात प्रकटलेल्या ललितासहस्त्रनामासह)

संपादक : सौ. उषा सहस्त्रबुद्धे

आनंदोत्सव
प्रकाशन मंच

प्रकाशक
चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

**ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा**
**(Rishi Agastyakrit - Stotra Manjusha)**
संपादक : सौ. उषा सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०
**E-mail : usahasrabuddhe@gmail.com**
**Website : www.anilsahasrabuddhe.in**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे

**प्रकाशक :**
आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३
फोन : (०२४१) २४२४१६७

**प्रथम आवृत्ती :** २४ ऑगस्ट २०१९

**टाईपसेटिंग-लेआऊट :**
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर ९८५०२३२८९०

**मुद्रक :**
मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

देणगीमूल्य रु. १००/-
टीप : 'ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा' या पुस्तकाचा संपूर्ण निर्मिती खर्च सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे यांनी केला असून, प्रकाशित सर्व प्रती अगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले, अ.नगर या ट्रस्टला अगस्त्यचरणी दान स्वरूपात समर्पित केल्या आहेत. 'आनंदोत्सव'ने सेवाभावी स्वरूपात मंच उपलब्ध करून दिला आहे. ग्रंथनिर्मिती, वितरण इ. कोणत्याही आयव्ययाशी 'आनंदोत्सव'चा संबंध नाही. ग्रंथातील संकलित, संपादित मजकूर, उल्लेख व विचार यांशी मंच सहमत असेलच असे नाही.

**आई (सौ. शारदा) आणि अप्पा (श्री. विनायक महादेव नातू)**
**यांच्या आशीर्वादपूर्वक**

**भगवान ऋषि अगस्तिमहाराज**
**यांचे चरणी**

# अकोले येथील ऋषि अगस्ति आश्रमाचे महत्त्व

भगवान ऋषि अगत्स्यमुनि यांचे, विश्वातील केंद्रस्थान म्हणजे अकोले येथील अगस्ति आश्रम होय. अगस्त्यांच्या आज्ञेनुसार लिहिल्या गेलेल्या 'अगस्त्य माहात्म्य' या ग्रंथातील माहितीनुसार ऋषि अगस्त्यांकडे सोपविलेले, विश्वातील, पर्जन्य, पर्यावरण, जल, जलप्रवाह, जलकुंभ, जीवसृष्टि यांच्या व्यवस्थापनाचे कार्य, अगस्त्य ऋषि नित्य, या केंद्रातून करीत आहेत. समाधिमग्न अवस्थेतून हे कार्य सुरू आहे. कृषिविद्या, धनुर्विद्या (युद्धविद्या), आरोग्यविद्या, संगीत, ब्रह्मविद्या, ज्योतिर्विद्या आणि मानव्यविद्या आदि विद्यांचे ज्ञान, या केंद्रात येऊन, अगस्त्यांची कृपा संपादन केल्याने सहज प्राप्त होते. मानवी जीवनातील इच्छा-आकांक्षा, यश-अपेक्षा यांची पूर्ति अगस्त्यांच्या उपासनेने होते. येथे ऋषिपत्नी लोपामुद्रांचेही स्थान आहे. स्त्रीशक्ती, बालआरोग्य आणि लक्ष्मीसंपादन याविषयीच्या अपेक्षा येथील उपासनेने पूर्ण होतात.

नगर जिल्ह्यातील अकोले येथील, ऋषि अगस्ति आश्रम नगर- नाशिक, इगतपुरी, औरंगाबाद, शिर्डी या महाराष्ट्रातील स्थळांपासून १०० ते १५० किलोमीटर अंतरावर आहे. या आश्रमातील, ऋषी अगस्त्यांच्या कृपाप्रसादाचा लाभ सर्वांना मिळावा, यासाठी अगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले, अॅड. के. डी. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली सेवारत आहे.

## आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या, आनंदोत्सव प्रकाशन मंच, या मंचाच्या माध्यमातून अगस्त्यचरणी समर्पित झालेली वाङ्मयसेवा

१) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत – अगस्त्य माहात्म्य – उपासना पोथी
२) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत – ऋषि लोपामुद्रा चरित्र – उपासना पोथी
३) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत – अगस्त्य अभंगावली
४) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत – नित्यपाठाचे अभंग
५) सौ. उषा सहस्रबुद्धे संपादित – ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा



# ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा

दि. २२ ऑगस्ट २०१९ रोजी, प्रसिद्ध होणाऱ्या उपरोक्त ग्रंथाच्या अवलोकनाने, मन नितांत प्रसन्न झाले. माझ्यादृष्टीने हा ग्रंथ खरोखरीच आनंदाची एक मर्मबंधातली ठेवच आहे.

खरे तर ऑगस्ट व श्रावण हा कालखंड, भारतीय परंपरेत राजकीय व सांस्कृतिक, आनंदोत्सव म्हणावा असाच आहे. ८ ऑगस्ट, १५ ऑगस्ट हे भारतीयांचे मानबिंदूच आहेत. त्यातही अगस्त्यांच्या संदर्भात, पर्जन्यवृष्टीच्या दृष्टीने व महर्षींच्या पर्यावरणविषयक योगदानावर, जलाभिषेक करणारा आहे. पर्जन्यवृष्टि, सरितांचे शुद्धीकरण आणि एका आचमनात समुद्रप्राशन, विंध्यदमन वगैरे विक्रमांशी अगस्त्य व ऑगस्ट ही नावे जुळणारी आहेत.

अशा अगस्त्यांच्या स्तोत्रांची मंजूषा (पेटी) आता सर्वांसाठी खुली होणार आहे. सौ. उषावहिनींचे संपादन लाभलेल्या या ग्रंथाचा अल्प परिचय व मूल्यमापन करण्याची संधि मिळाली हे माझे भाग्य समजतो. कारण विद्यावाचस्पति, पीएच्.डी. पदवीच्या निमित्ताने मला अगस्त्यांचे जवळून दर्शन घडले, त्याला मी साक्षात्कार म्हणणार नाही, तो अपूर्व लाभ आहे व तो सहस्रबुद्धे परिवाराला मिळाला आहे.

**(१) अपूर्व संकलन –**

हे एकूण ६ स्तोत्रांचे संकलन आहे. ही सर्व स्तोत्रे आजपर्यंत अज्ञात व अपरिचित होती. १० हजार वर्षांपूर्वीच्या श्रुति वाङ्मयापासून, आजच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत आणि महापुराणे, पंचमहाकाव्ये, ललित साहित्यात सर्वच अगस्त्य ऋषि व अगस्त्य संकल्पना ओसंडून वाहत आहे, उत्तर व दक्षिण

भारत, आग्नेय आशियातील, जावा, सुमात्रासारखे देश, काही पाश्चात्य देश अगस्त्यमय झाले आहेत. मात्र अगस्त्यनिर्मित साहित्यात, त्यांच्या गेय-प्रासादिक स्तोत्रांचा मागमूसही नाही. म्हणून प्रस्तुत संकलन, अपूर्व आहे. ते Invention नसून Discovery ठरते. या संशोधनासाठी आनंदोत्सव-परिवाराचे अभिनंदन! अगस्त्यांची ३३ सूक्ते, त्यांची जन्मकथा ऋग्वेदात आहे. यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेदातही अगस्त्यसूक्ते आहेत. अनेक अगस्त्य-गीताही आहेत. पण, स्तोत्रांचा निर्देश अभावानेच आहे. म्हणून हीच या संकलनाची अपूर्वाई!

**(२) अगस्त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, आगळा आविष्कार –**

वैदिक व पौराणिक वाङ्मयात, अगस्त्यांचे महान् विभूतिमत्व, देवत्व चित्रित झाले आहे. प्रस्तुतची स्तोत्रे, अगस्त्य व लोपामुद्रेच्या कवित्वाची, काव्यमय शैलीची व भावभक्तीचे दर्शन घडविणारी आहेत. एकप्रकारे हे, या थोर दाम्पत्याचे व्यक्तिदर्शन आहे. स्तोत्रांची प्रासादिकता, गेयता, मनाचा ठाव घेणारी व मनाला भावणारी आहेत. अनुप्रास अलंकार व पुनरुक्तिमुळे पालुपदे गुणगुणावीशी वाटतात.

**(३) स्त्रीशक्तीचा जागर –**

एकूण हा ग्रंथ, एकप्रकारे, स्त्री-शक्तीचा जागर आहे. स्वतः संपादिका सौ. उषावहिनी या मातब्बर सल्लागार आहेत. शेकडो पुस्तकांचे प्रकाशन, असंख्य पुरस्कारांची देवाण-घेवाण, अनेक मैफली, परिसंवाद, सत्कार हे सर्व, आपले माहेर असे समजून, उषावहिनींनी, म्हणजे आधुनिक लोपामुद्रांनी मोठ्या प्रेमाने, पडद्यामागील कलाकार या नात्याने, सर्व सूत्रे हातात घेऊन, अत्यंत नेटाने व निगुतीने, कर्तव्यभावनेने पार पाडली आहेत. कधी कधी हिमालय मोठा, की त्याची सावली मोठी अशी शंका वाटावी असे अर्धनारीनटेश्वराचे मनोमन दर्शन घडते.

ग्रंथाच्या नायिका पाहता इथे स्त्रीचेच पानोपान 'चित्र' दिसते. सरस्वती, लक्ष्मी, महालक्ष्मी, ललिता व दस्तुरखुद्द भगवती लोपामुद्रा, असे हे स्त्रीसाम्राज्य आहे. आदित्यहृदय स्तोत्राला अल्पसे आरक्षण मिळाले आहे. सौ. उषावहिनींच्या अधिकाराने इतरांची नाममुद्रा लोप (लुप्त) पावली आहे. इथे उषा व मुद्रा यातील साम्य-ऐक्य सहज जाणवणारे आहे! कारण मुद्रा व उषामध्ये 'उ' समान आहे.



**(४) साधार, ससंदर्भ संकलन –**

प्रत्येक स्तोत्राखाली त्याच्या मूळ आधार, अनुवादाचा मूळ लेखक हे सर्व साक्षेपाने नमूद केले आहे. 'नामूलं लिख्यते किञ्चित् ।' याचा इथे अनुभव येतो, व तो वाखाणण्याजोगा आहे.

**(५) समर्पणभाव –**

'इदं न मम', हा भाव प्रकाशनात जाणवतो. माता-पित्यांचे आशीर्वाद घेऊन, भगवान् अगस्ति महाराजांना हा ग्रंथराज संपादिकेने अर्पण केला आहे. पुस्तकाचे मूल्य देणगी स्वरूपात केवळ रु. १००/- आहे. स्वतः सर्व खर्च करून, देणगी मिळेल तेव्हढी अगस्त्य-चरणी समर्पित होणार आहे. 'मी न माझी राहिले' या समर्पणभावाला प्रणाम!

**(६) स्तोत्रांचे साहित्यिक व धार्मिक महत्त्व –**

अगस्त्यकृत महालक्ष्मीस्तुती ही एक अष्टपदी असून जयदेवाच्या गेय व प्रासादिक अष्टपदींची आठवण करून देणारी आहे. उदा.

(१) मातर्नमामि कमले कमलायताक्षि । (श्लो. १)

(२) मान्यः स + एव कुलशीलकलाकलापैः । (श्लो. ५)

याचा भावानुवादही बोलका आहे.

श्री ललितासहस्रनामस्तोत्र सुद्धा लालित्यपूर्ण आहे. जसे

(१) श्रीमाता, श्री महाराज्ञी, श्रीमत् सिंहेश्वरी । (श्लो १)

(२) ताराकान्ति तिरस्कारि नासाभरण भासुरा । (श्लो. ७)

लोपामुद्रेच्या लक्ष्मीस्त्रोतातही असाच गोडवा आढळतो -

(१) लक्ष्मीः श्री कमले पद्मे रमे पद् मोद्भवे सति (श्लो. ९)

फलश्रुतीचे सर्वच श्लोक, हा उपासना ग्रंथ असल्याचे दाखवितात. सर्व स्तोत्रे नित्यपठन व जप करावीत अशीच आहेत. यात साहित्यिक, सांगीतिक आनंदाबरोबरच, अध्यात्म दर्शनही होणार आहे, अजपा-जपाप्रमाणे आदित्यस्तोत्रमंत्र हे या ग्रंथात काहीसे अल्पसंख्य, आरक्षित स्तोत्र असले तरी, त्याच्यामुळे अगस्त्यांच्या सौरशक्ति व पर्यावरण विषयक योगदानावर प्रकाश पडतो. हा द्रष्टा ऋषि ज्ञानाबरोबर विज्ञानाचेही दैवत आहे.

**(७) आनंदोत्सवाची निर्मिती –**

'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशीच ही निर्मिति आहे. सृजनशीलते, तुझे नाव आनंद! नगरचा हा न्यास, संस्था नव्हे, विश्वविद्यालय, विद्यापीठ

आहे. अगणित ग्रंथनिर्मिति, प्रकाशने, पुरस्कारांची, परिसंवादांची, सत्कारांची, दिग्गजांच्या भेटींची, मैफलींची, सतत क्रियाशील, चालते-बोलते असणाऱ्या व्यासपीठांची, खचित्च मांदियाळी आहे. अनेक गुणीजन, कलाकारांचे हा चालता बोलता विश्वकोश आहे. प्रेमस्वरूप, वात्सल्यसिंधू 'आई' च्या माया-ममतेच्या कुशीत, ऊबेत ही संस्था चांगलीच फोफावली आहे, दृष्ट लागावी किंवा न लागावी अशी...

थोडक्यात या ग्रंथरूपी मर्मबंधातील ठेव्याबद्दल एव्हढेच म्हणेन-

**स्तोत्रमंजूषा नितांत मधुरा**
**स्त्रीशक्तीचा नागर खरा ।**
**सरस्वती, लक्ष्मी, ललिता**
**लोपामुद्रा तशीच सौ. उषा ।**
**पूज्यन्ते यत्र नार्यः**
**रमन्ते तत्र देवताः ।।**

– शुभं भवतु –

**– प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर**
चलध्वनि क्र. ७७४३९००७५२

●●●



# मनोगत

'ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा' या ग्रंथात भगवान अगस्ति ऋषींनी रचलेले श्रीसरस्वतीस्तोत्र, श्रीलक्ष्मीस्तोत्र आणि आदित्यहृदयम्स्तोत्रमंत्र ही स्तोत्रे सार्थ संपादित केली आहेत. त्याचप्रमाणे श्रीलोपामुद्राकृत लक्ष्मी स्तोत्र व हयग्रीव-अगस्त्य संवादात प्रकटलेले ललितासहस्रनाम आणि अगस्त्यकृत सार्थ महालक्ष्मीस्तुति यांचे संकलन या ग्रंथात केले आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून अगस्ती ऋषींची सेवा करण्याचे भाग्य आम्हा उभयतांना मिळाले आहे. 'श्रीअगस्त्यमाहात्म्य' हा डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचा साक्षात्कारपूर्वक झालेला उपासना ग्रंथ, कॉम्प्युटरवर टंकलिखित करण्याचे भाग्य मला मिळाले. तसेच 'अगस्त्य' कादंबरीची मी पहिली वाचक होते. भगवान अगस्ति ऋषींच्या आणखी काही स्तोत्रांचा शोध, मी वेबसाईटवर घेतला. तेव्हा भगवान अगस्त्य ऋषिकृत श्रीसरस्वतीस्तोत्र, श्रीलक्ष्मीस्तोत्र आणि आदित्यहृदयम् स्तोत्र मंत्र ही संस्कृतमधील स्तोत्रे मिळाली. ही तीनही स्तोत्रे इंग्रजीत भाषांतरित केलेली आहेत. त्यांचे मराठीत भाषांतर केले. 'अगस्त्यकृत सार्थ महालक्ष्मी स्तुति' या स्तोत्राचा भावानुवाद डॉ. प्र. न. जोशी यांनी स्कंदपुराण-उत्तरार्ध स्तोत्रमंजूषामध्ये केलेला आहे. त्याचे संकलन या ग्रंथात केले आहे. अगस्त्य ऋषींची ही सेवा माझ्याकडून घडते आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे.

हा उपासना ग्रंथ पूर्णत्वास नेताना, डॉ. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, सौ. कुमुदिनी बोपर्डीकर तसेच डॉ. श्रीकांत केळकर यांची खूप मदत झाली. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानते आणि भगवान् अगस्त्य ऋषींच्या चरणी हा ग्रंथ अर्पण करते.

**– सौ. उषा सहस्रबुद्धे**

●●●

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अगस्त्यविरचित मराठी सार्थ सरस्वती स्तोत्र | ११ |
| २) | अगस्त्यकृत मराठी सार्थ लक्ष्मीस्तोत्र | १८ |
| ३) | अगस्त्यकृत मराठी सार्थ आदित्यहृदयम् स्तोत्रमंत्र | २७ |
| ४) | अगस्त्यकृत महालक्ष्मीस्तुति | ३६ |
| ५) | श्रीललितासहस्रनामस्तोत्र | ४१ |
| ६) | लोपामुद्राप्रोक्तम् श्रीलक्ष्मीस्तोत्रं | ४५ |






# अगस्त्यविरचित
# मराठी सार्थ सरस्वती स्तोत्र

अगस्त्यविरचित् श्रीसरस्वतीस्तोत्र हे भारतवर्षात अतिशय प्रसिद्ध, लोकप्रिय असे सरस्वतीस्तवन आहे. सर्व मंगल, सभासंमेलन प्रसंगी ईशस्तवनाच्या निमित्ताने हे सरस्वती-स्तवन व्यक्तिगत किंवा सामुदायिक म्हटले जाते अशी प्रथा आहे. त्यामुळे हे सरस्वती स्तोत्र 'या कुन्देन्दु...' या नावानेच प्रसिद्ध आहे. हे सरस्वती स्तोत्र वास्तविक एकवीस कडव्यांचे आहे आणि ते अगस्त्यविरचित आहे हेही बहुतेकांना माहिती नसते.

लोकपरंपरेत या स्तोत्राला लोकगीताचे रूप प्राप्त झाले आहे. हे सरस्वती स्तोत्र, संपूर्ण व सार्थ स्वरूपात प्राप्त करून देण्याचा, हा नम्र प्रयत्न आहे. सरस्वती देवीचे विलोभनीय, मंगल असे रूपदर्शन या स्तोत्रात असल्याने गायक भक्ताला सगुण भक्तीचा अलौकिक आनंद मिळतो.

**या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता**
**या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।**
**या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा पूजिता**
**सा मां पातु सरस्वति भगवति निःशेषजाड्यापहा ।।१।।**

जाईच्या फुलाप्रमाणे शुभ्रवर्णा असलेल्या, चंद्रासारखी शीतल, दंवबिंदूप्रमाणे तेजस्वी, मोत्यांच्या माळेने शोभून दिसणाऱ्या आणि शुभ्रवस्त्र परिधान केलेल्या; जिच्या हातात वीणा शोभून दिसते आहे, जी शुभ्र कमळावर विराजमान झाली आहे; ब्रह्मा, विष्णु, शंकर आणि देवतांना पूजनीय असलेल्या; अशा देवी सरस्वतीला माझा नमस्कार असो.

**दोर्भिर्युक्ता चतुर्भिः स्फटिकमणिनिभैरक्षमालांदधाना**
**हस्तेनैकेन पद्मं सितमपि च शुकं पुस्तकं चापेरण ।**
**भासा कुन्देन्दुशङ्खस्फटिकमणिनिभा भासमानाऽसमाना**
**सा मे वाग्देवतेयं निवसतु वदने सर्वदा सुप्रसन्ना ।।२।।**

चतुर्भुज असलेल्या जिच्या एका हातात स्फटिक मण्यांची माळ शोभून दिसते; एका हातात शुभ्र कमळ आणि एका हातात शुक मुनींचे तत्त्वज्ञानाचे पुस्तक शोभून दिसते; (एक हात वीणा वादनात रंगला आहे.) जाई, शंख, स्फटिक यांच्या रंगछटांमुळे जिचे तेज अतुलनीय दिसते; अशा वाणीच्या देवतेने माझ्या जिभेवर सदैव वास करून; माझ्यावर सुप्रसन्न व्हावे.



**सुरासुरसेवितपादपङ्कजा**
**करे विराजत्कमनीयपुस्तका ।**
**विरञ्चिपत्नी कमलासनस्थिता**
**सरस्वती नृत्यतु वाचि मे सदा ।।३।।**

जिची पदकमले देव आणि असुरांना वंदनीय आहेत; जिच्या हातात पुस्तक शोधून दिसते; विरंचि पत्नी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, कमळावर विराजमान झालेल्या; अशा देवी सरस्वतीने माझ्या वाणीवर सदैव नृत्य करावे.

**सरस्वती सरसिजकेसरप्रभा**
**तपस्विनी सितकमलासनप्रिया ।**
**घनस्तनी कमलविलोललोचना**
**मनस्विनी भवतु वरप्रसादिनी ।।४।।**

कमलपुष्पाप्रमाणे तेजस्वी, सुंदर असलेली; तपस्विनी असून जिला शुभ्र कमलासन प्रिय आहे; पाण्याने भरलेल्या ढगांप्रमाणे पाणीदार व कमळाच्या पाकळ्यांसारखे नेत्र (लोचन) असलेल्या, हे मनस्विनी, देवी सरस्वती, आमच्यावर तुझा कृपाशीर्वाद असू दे.

**सरस्वति नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणी ।**
**विद्यारम्भं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा ।।५।।**

वरदायिनी, इच्छापूर्ती करणाऱ्या हे देवी सरस्वती, तुला माझा नमस्कार असो. मी विद्याध्ययनास प्रारंभ करीत आहे. मला सर्वदा (नेहेमी) यश, सिद्धि प्राप्त होऊ दे.

**सरस्वति नमस्तुभ्यं सर्वदेवि नमो नमः ।**

**शान्तरूपे शशिधरे सर्वयोगे नमो नमः ।।६।।**

सर्व देवतांचे मूर्त स्वरूप असलेल्या देवी सरस्वती, तुला माझा नमस्कार असो; शांतरूपिणी, चंद्रमा धारण केलेल्या, सर्व योगांचे मूर्त स्वरूप असलेल्या देवी सरस्वती, तुला नमस्कार करतो.

**नित्यानन्दे निराधारे निष्कलायै नमो नमः ।**

**विद्याधरे विशालाक्षि शुद्धज्ञाने नमो नमः ।।७।।**

प्रसन्न, पवित्र, विद्येचे मूर्त रूप असलेल्या, विशालनेत्रा, अशा ज्ञानाच्या मूर्त रूपाला अर्थात देवी सरस्वतीला माझा नमस्कार असो.

**शुद्धस्फटिकरूपायै सूक्ष्मरूपे नमो नमः ।**

**शब्दब्रह्मि चतुर्हस्ते सर्वसिद्ध्यै नमो नमः ।।८।।**

शुद्धस्फटिकरूपा, चाणाक्ष, शब्दब्रह्माचे मूर्त रूप असलेल्या, चतुर्भुजा, सर्व सिद्धि प्राप्त असलेल्या देवी सरस्वतीला माझा नमस्कार असो.

**मुक्तालङ्कृतसर्वाङ्ग्यै मूलाधारे नमो नमः ।**

**मूलमन्त्रस्वरूपायै मूलशक्त्यै नमो नमः ।।९।।**

मोत्यांच्या अलंकारांनी सुशोभित झालेल्या, ब्रह्मांडाचा मूलाधार असलेल्या, सर्वमूलमंत्र आणि मूलशक्तिरूपा, तुला माझा नमस्कार असो.

**मनो मणिमहायोगे वागीश्वरि नमो नमः ।**

**वाग्भ्यै वरदहस्तायै वरदायै नमो नमः ।।१०।।**



हे वागेश्वरी, तुझ्या मनोमनी योगसाधनेने महायोग मणिबंध (अर्थात् अद्वैत सिद्धि) साधला जातो; अशा तुझ्या वाग्वैभवाच्या वरदहस्ताचा (अर्थात्) वर देणाऱ्या अशा तुला माझा नमस्कार असो.

**वेदायै वेदरूपायै वेदान्तायै नमो नमः ।**

**गुणदोषविवर्जिन्यै गुणदीप्त्यै नमो नमः ।।११।।**

वेद, वेदरूपा आणि वेदान्त (अशा त्रिविधरूप) असलेल्या गुणदोषांचा निवाडा करून; गुणांना प्रकाशित करणाऱ्या, अशा देवी सरस्वती, तुला माझा नमस्कार असो.

**सर्वज्ञाने सदानन्दे सर्वरूपे नमो नमः ।**

**सम्पन्नायै कुमार्यै च सर्वज्ञे नमो नमः ।।१२।।**

सर्वज्ञानी, तेजस्वी, सर्वरूपा असलेल्या, संपन्न, प्रसन्न, सर्वज्ञ, कुमारी अशा तुला माझा नमस्कार असो.

**योगानार्य उमादेव्यै योगानन्दे नमो नमः ।**

**दिव्यज्ञान त्रिनेत्रायै दिव्यमूर्त्यै नमो नमः ।।१३।।**

योगिनी, उमादेवी, योगानन्दे, दिव्यज्ञानाचे त्रिनेत्र असलेल्या, दिव्यमूर्तीला माझा नमस्कार असो.

**अर्धचन्द्रजटाधारि चन्द्रबिम्बे नमो नमः ।**

**चन्द्रादित्यजटाधारि चन्द्रबिम्बे नमो नमः ।।१४।।**

सूर्यचंद्राचे तेज आणि अर्धचंद्र आपल्या कुरळ्या जटांवर (केसांवर) धारण केलेल्या, चंद्रबिंबाचे तेज मुखावर असलेल्या अशा तुला माझा नमस्कार असो.

**अणुरूपे महारूपे विश्वरूपे नमो नमः ।**

**अणिमाद्यष्टसिद्ध्यायै आनन्दायै नमो नमः ।।१५।।**

(लघु) अणुरूप, (महा) विशालरूप आणि विश्वरूप असलेल्या आणि अणिमा-गरिमादी अष्टसिद्धि प्राप्त असलेल्या, आनंदी असलेल्या अशा तुला नमस्कार असो.

**ज्ञानविज्ञानरूपायै ज्ञानमूर्ते नमो नमः ।**

**नानाशास्त्रस्वरूपायै नानारूपे नमो नमः ।।१६।।**

ज्ञानविज्ञानाचे रूप असलेल्या, ज्ञानमूर्ती, आणि अनेक शास्त्रस्वरूपा अनेकरूपा अशा तुला नमस्कार असो.

**पद्मदा पद्मवंशा च पद्मरूपे नमो नमः ।**

**परमेष्ठ्यै परामूर्त्यै नमस्ते पापनाशिनि ।।१७।।**

कमलाप्रमाणे, पद्मवंशा, पद्मरूपा तुला नमस्कार असो. परमश्रेष्ठ, अलौकिक, मूर्त रूप असलेल्या, पापनाशिनी तुला माझा नमस्कार असो.

**महादेव्यै महाकाल्यै महालक्ष्म्यै नमो नमः ।**

**ब्रह्मविष्णुशिवायै च ब्रह्मनार्यै नमो नमः ।।१८।।**

हे महादेवी, महाकाली, महालक्ष्मी तुला माझा नमस्कार असो. ब्रह्मा, विष्णू, शिवांचे मूर्त रूप असलेल्या नारी रूप ब्रह्म असलेल्या अशा तुला माझा नमस्कार असो.

**कमलाकरपुष्पा च कामरूपे नमो नमः ।**

**कपालि कर्मदीप्तायै कर्मदायै नमो नमः ।।१९।।**



कमलात प्रकट झालेली, सर्व इच्छापूर्ती करणारी, कापालिक योग मार्गाने सिद्ध होणारी, योग्य कर्मे करवून घेणारी आणि कर्मे सिद्धीस नेणारी अशा देवी सरस्वती, तुला माझा नमस्कार असो.

**सायं प्रातः पठेन्नित्यं षण्मासात् सिद्धिरुच्यते ।**

**चोरव्याघ्रभयं नास्ति पठतां शृण्वतामपि ।।२०।।**

जो या स्तोत्राचे सहा महिने सकाळी सायंकाळी नित्य पठण करेल त्यास सिद्धि प्राप्त होईल. या स्तोत्राचे पठण, श्रवण केल्याने चोरभय अथवा हिंस्त्र पशूंचे भय असणार नाही.

**इत्थं सरस्वतीस्तोत्रम् अगस्त्यमुनिवाचकम् ।**

**सर्वसिद्धिकरं नृणां सर्वपापप्रणाशनम् ।।२१।।**

अगस्त्यमुनींनी रचलेले हे सरस्वती स्तोत्र सर्व सिद्धि प्राप्त करून देणारे आणि वाचकांच्या सर्व पापांचा नाश करणारे आहे.

।। इति श्री अगस्त्यमुनींनी सांगितलेले सरस्वतीस्तोत्र संपूर्ण ।।


i) www.stutimandal.com/poemgem.phipqid=297

ii) https://www.goole.com/search q - Agastya Virachit Saraswati Stotra.

iii) Saraswati Stotram (By Agastya Rishi Stotram.com.in/ Saraswati.Stotram-by-agastya-rishi


●●●



# अगस्त्यकृत
# मराठी सार्थ लक्ष्मीस्तोत्र

अगस्त्य ऋषि हे लक्ष्मीमातेचे भक्त होत. शिवस्वरूप अगस्त्य ऋषि स्वतः सिद्ध, महान योगी, मंत्रद्रष्टे आणि तंत्र सिद्ध करणारे, यंत्र सिद्ध करणारे महान तंत्रज्ञ आणि भविष्यवेत्ते आहेत. लक्ष्मीमातेला प्रसन्न करून सर्व प्रकारची ईप्सित कार्ये आणि उदंड ऐश्वर्य सद्‌भक्तांना प्राप्त करून घेता यावे; मानवी व्यवहारात पुरुषार्थसंपन्न होता यावे यासाठी अगस्त्यांनी



लक्ष्मीस्तोत्र सिद्ध केले असून, त्याला मंत्रस्वरूप प्राप्त करून दिले आहे. मानवाला इहजीवनात ऐश्वर्यप्राप्तीची आस असते. श्रद्धापूर्वक, मंत्र या दृष्टीने, या स्तोत्राचे पठण केल्यास, सर्व मनोकामना पूर्ण होऊन यश, ऐश्वर्य प्राप्त होते.

**जय पद्मपलाशाक्षि जयं त्वं श्रीपतिप्रिये ।**

**जय मातर्महालक्ष्मि संसारार्णवतारिणि ।।१।।**

हे कमलानेत्रा, विष्णुला प्रिय असलेल्या, विष्णुप्रिया, या भवसागरातून तारुन नेणाऱ्या हे माते महालक्ष्मी, तुझा जयजयकार असो.

**महालक्ष्मि नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं सुरेश्वरि ।**

**हरिप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे ।।२।।**

देवांवर अधिराज्य असणाऱ्या हे सुरेश्वरी, हरीला प्रिय असलेल्या हरिप्रिये, हे दयानिधि महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो.

**पद्मालये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं च सर्वदे ।**

**सर्वभूतहितार्थाय वसुवृष्टिं सदा कुरु ।।३।।**

हे कमलवासिनी पद्मालया, संपत्ती प्रदान करणाऱ्या हे महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो. सर्व लोकांच्या हितासाठी संपत्तीची वृष्टि तू सर्वदा करावीस.

**जगन्मार्तनमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे ।**

**दयावति नमस्तुभ्यं विश्वेश्वरि नमोऽस्तु ते ।।४।।**

हे जगन्माते, दयानिधि तुला माझा नमस्कार असो. हे दयावती, विश्वावर अधिराज्य करणाऱ्या विश्वेश्वरी, तुला माझा नमस्कार असो.

**नमः क्षीरार्णवसुते नमस्त्रैलोक्यधारिणि ।**

**वसुवृष्टे नमस्तुभ्यं रक्ष मां शरणागतम् ।।५।।**

क्षीरसागराची कन्या, त्रैलोक्याचा आधार असलेल्या, धनाची बरसात करणाऱ्या, हे माते महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो. मी तुला शरण आलो आहे. माझे रक्षण कर.

**रक्ष त्वं देवदेवेशि देवदेवस्य वल्लभे ।**

**दरिद्र्याद् त्राहि मां लक्ष्मि कृपां करु ममोपरि ।।६।।**

देवाधिदेव विष्णूंच्या सान्निध्यात असलेली, देवाधिदेव विष्णूंची वल्लभा (पत्नी) महालक्ष्मी माझे रक्षण कर. दारिद्र्यापासून माझे रक्षण करून हे लक्ष्मी, माझ्यावर कृपा कर.

**नमस्त्रैलोक्यजननि नमस्त्रैलोक्यपावनि ।**

**ब्रह्मादयो नमस्ते त्वां जगदानन्ददायिनि ।।७।।**

हे त्रैलोक्यजननी, त्रैलोक्यपावनी तुला माझा नमस्कार असो. ब्रह्म प्रकटविणाऱ्या, जगताला आनंद देणाऱ्या हे लक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो.

**विष्णुप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं जगद्धिते ।**

**आर्तहन्त्रि नमस्तुभ्यं समृद्धिं कुरु मे सदा ।।८।।**

जगताचे हित करणाऱ्या, विष्णूप्रिया, तुला नमस्कार असो. दुःखाचा विनाश करणाऱ्या हे लक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो. मला सदैव समृद्धी लाभू दे.



**अब्जवासे नमस्तुभ्यं चपलायै नमो नमः ।**

**चञ्चलायै नमस्तुभ्यं ललितायै नमो नमः ।।९।।**

हे कमलवासिनी, (अब्ज-ऐश्वर्यमयी) चपला, चंचला, ललिता अशा लक्ष्मी माते तुला नमस्कार असो.

**नमः प्रद्युम्नजननि मातुस्तुभ्यं नमो नमः ।**

**परिपालय भो मातर्मां तुभ्यं शरणागतं ।।१०।।**

प्रद्युम्नाची माता असलेल्या लक्ष्मी माते, तुला नमस्कार असो. हे माते, माझे परिपालन, रक्षण कर. मी तुला शरण आलो आहे. (मी तुला शरणागत आहे.)

**शरण्ये त्वां प्रपन्नोऽस्मि कमले कमलालये**

**त्राहि त्राहि महालक्ष्मि परित्राणपरायणे ।।११।।**

हे कमले, कमलवासिनी, मी तुला शरण आलो आहे. हे महालक्ष्मी, संकटापासून माझे रक्षण कर, रक्षण कर.

**पाण्डित्यं शोभते नैव न शोभन्ति गुणा नरे ।**

**शीलत्वं नैव शोभते महालक्ष्मि त्वया विना ।।१२।।**

हे महालक्ष्मी, नराचे (व्यक्तीचे / मानवाचे) पांडित्य, सद्गुण आणि शीलत्व तुझ्याशिवाय शोभून दिसत नाही.

**तावद्विराजते रूपं तावच्छीलं विराजते ।**

**तावद्गुणा नराणां च यावल्लक्ष्मीः प्रसीदति ।।१३।।**

जोपर्यंत लक्ष्मीचा कृपाशीर्वाद आहे (असतो) तोपर्यंत नराचे (व्यक्तीचे) सद्गुण, शील आणि रूप शोभून दिसतात.

**लक्ष्मि त्वयालङ्कृतमानवा ये पापैर्विमुक्ता नृपलोकमान्याः ।**
**गुणैर्विहीना गुणिनो भवन्ति द:शीलिनः शीलवतां वरिष्ठाः ।।१४।।**

हे लक्ष्मी, तुझ्या कृपेने अलंकृत झालेला राजासुद्धा पापातून मुक्त होतो आणि लोकमान्य होतो; दुर्गुणी किंवा अवगुणी माणूस सद्गुणी होतो, शीलभ्रष्ट किंवा चारित्र्यहीन माणूस चारित्र्यसंपन्न श्रेष्ठ होतो.

**लक्ष्मीर्भूषयते रूपं लक्ष्मीर्भूषयते कुलम् ।**
**लक्ष्मीर्भूषयते विद्यां सर्वाल्लक्ष्मीर्विशिष्यते ।।१५।।**

लक्ष्मीच्या कृपाप्रसादाने रूप, कुल आणि विद्या यांना नावलौकिक प्राप्त होतो.

**लक्ष्मि त्वद्गुणकीर्तनेन कमलाभूयात्यलं जिह्मताम् ।**
**रुद्राद्या रविचन्द्रदेवपतयो वक्तुं च नैव क्षमाः ।।१६।।**

हे लक्ष्मी माते, रुद्र, सूर्य, चंद्रादि देव, आणि इंद्रही तुझे गुणवर्णन, गुणकीर्तन करू शकत नाहीत तसेच ब्रह्मदेवही तुझे गुणवर्णन करू शकत नाही.

**अस्माभिस्तव रूपलक्षणगुणान्वक्तुं कथं शक्यते ।**
**मातर्मां परिपाहि विश्वजननि कृत्वा ममेष्टं ध्रुवं ।।१७।।**

तर मी (आम्ही) तुझ्या सौंदर्याचे, गुणांचे वर्णन कसे करू शकू? (आम्ही तुझे रूपगुणांचे वर्णन करण्यास असमर्थ आहोत.) हे जगत्जननी,



माझे रक्षण कर. मला कृपाशीर्वाद मिळू दे.

**दीनार्तिभीतं भवतापपीडित धनैर्विहीनं तव पार्श्वमागतम् ।**
**कृपानिधित्वान्मम लक्ष्मि, सत्वरं धनप्रदानाद्धननायकं कुरु ।।१८।।**

अतिशय दीनवाण्या, भयभीत झालेल्या आणि संसारतापाने पीडित निर्धन, दरिद्री अशांवर, हे कृपानिधि असलेल्या लक्ष्मीमाते, तू त्यांच्यावर कृपा करून त्यांना धनवान् कर.

**मां विलोक्य जननि हरिप्रिये निर्धनं त्वत्समीपमागतम् ।।१९।।**

निर्धन असा मी, तुझ्या पायांपाशी आलो आहे. हे हरिप्रिया लक्ष्मीमाते, माझ्यावर कृपादृष्टि असू देत.

**देहि मे झटिति लक्ष्मि कराग्रं**
**वस्त्रकांचनवरान्नमद्भुतम् ।।२०।।**

हे लक्ष्मी माते, मला सुंदर वस्त्रे, धन धान्य प्रदान कर.

**त्वमेव जननी लक्ष्मि पिता लक्ष्मि त्वमेव च ।।२१।।**

हे लक्ष्मी, तूच माता आणि तूच पिता आहेस.

**त्राहि त्राहि महालक्ष्मि त्राहि त्राहि सुरेश्वरि ।**
**त्राहि त्राहि जगन्मातर्दरिद्रात्त्राहि वेगतः ।।२२।।**

हे महालक्ष्मी, देवांवर अधिराज्य असणाऱ्या हे सुरेश्वरी, हे जगन्माते, (जगत् जननी) दारिद्र्यापासून माझे रक्षण कर, माझे रक्षण कर.

**नमस्तुभ्यं जगद्धात्रि नमस्तुभ्यं नमो नमः ।**

**धर्माधारे नमस्तुभ्यं नमः सम्पत्तिदायिनी ।।२३।।**

जगताला धारण करणाऱ्या हे (जगत्‌धात्री) महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो. धर्माचा मूलाधार असलेल्या आणि संपत्ती प्रदान करणाऱ्या हे महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो.

**दरिद्रार्णवमग्रोऽहं निमग्नोऽहं रसातले ।**

**मज्जन्तं मां करे धृत्वा सुद्धर त्वं रमे द्रुतं ।।२४।।**

दारिद्र्यरूपी सागरात मी रसातळास जात आहे. हे रमे, महालक्ष्मी, बुडत असलेल्या मला हात देऊन सत्वर माझा उद्धार कर.

**किं लक्ष्मि बहुनोक्तेन जल्पितेन पुनः पुनः ।**

**अनन्ये शरणं नास्ति सत्यं सत्यं हरिप्रिये ।।२५।।**

हे लक्ष्मी, मी तुला वारंवार विनवित आहे की तुझ्याशिवाय मला दुसरे आश्रयस्थान नाही. हे हरिप्रिये, मी तुला शरण आलो आहे. तूच माझा उद्धार कर.

**एतच्छ्रुत्वाऽगस्तिवाक्यं हृष्यमाणा हरिप्रिया ।**

**उवाच मधुरां वाणीं तुष्टाहं तव सर्वदा ।।२६।।**

अगस्तींचे हे वचन (वाक्य) ऐकून हरिप्रिया महालक्ष्मी आनंदित झाल्या आणि मधुर वाणीने म्हणाल्या, 'मी तुझ्यावर नेहमीच प्रसन्न आहे.'

**लक्ष्मीरुवाच**

**यत्त्वयोक्तमिदं स्तोत्रं यः पठिष्यति मानवः ।**

**शृणोति च महाभागस्तस्याहं वशवर्तिनी ।।२७।।**



लक्ष्मी म्हणतात–

तू शब्दबद्ध केलेल्या या स्तोत्राचे, जो मानव (व्यक्ति) पठण करेल किंवा श्रवण करेल, त्याला मी वश होईल.

**नित्यं पठति यो भक्त्या त्वलक्ष्मीस्तस्य नश्यति ।**

**रणश्च नश्यति तीव्रं वियोगं नैव पश्यति ।।२८।।**

जो या स्तोत्राचे भक्तिपूर्वक नित्य वाचन करील त्याचे निर्धनत्व नष्ट होईल तसेच त्याच्या शत्रूंचा निःपात होऊन, त्याला वियोग सहन करावा लागणार नाही.

**यः पठेत्प्रातरुत्थाय श्रद्धाभक्तिसमन्वितः ।**

**गृहे तस्य सदा स्थास्ये नित्यं श्रीपतिना सह ।।२९।।**

सकाळी उठल्यावर या स्तोत्राचे जो श्रद्धापूर्वक भक्तिपूर्वक पठण करेल, त्याच्या घरी विष्णुंसह लक्ष्मीचा सदैव वास असेल.

**सुखसौभाग्यसम्पन्नो मनस्वी बुद्धिमान् भवेत् ।**

**पुत्रवान्गुणवान्श्रेष्ठो भोगभोक्ता च मानवः ।।३०।।**

तो सुखी, समृद्ध होईल, अतिशय बुद्धिमान होईल, तो पुत्रवान होईल, गुणवान होईल, त्याची भरभराट होईल. सुख भोगणारा मानव तो होईल.

**इदं स्तोत्रं महापुण्यं लक्ष्म्यगस्तिप्रकीर्तितं ।**

**विष्णुप्रसादजननं चतुर्वर्गफलप्रदम् ।।३१।।**

अगस्तींनी गुणगान केलेले (गौरविलेले) हे लक्ष्मीस्तोत्र अतिशय

पुण्यप्रद आहे तसेच विष्णुकृपेमुळे मिळणारी (प्राप्त होणारी) चारी सुखे प्राप्त होतात.

**राजद्वारे जयश्चैव शत्रोश्चैव पराजयः ।**

**भूतप्रेतपिशाचानां व्याघ्राणां न भयं तथा ।।३२।।**

ह्या स्तोत्राने राजदरबारी विजय प्राप्त होतो; शत्रूचा पराजय होतो. भूत, प्रेत, पिशाच्च तसेच वन्य पशूंचे भय राहत नाही.

**न शस्त्रानलतोयाद्भयं तस्य प्रजायते ।**

**दुर्वृत्तानां च पापानां बहुहानिकरं परम् ।।३३।।**

ह्या स्तोत्राने शस्त्रास्त्रे, अग्नि, पाणी ह्यापासून असलेले भय नष्ट होते. तसेच हानिकारक दुर्वर्तन आणि पापे यांचा विनाश होतो.

**मन्दुराकरिशालासु गवां गोष्ठे समाहितः ।**

**पठेत्तद्दोषशान्त्यर्थं महापातकनाशनम् ।।३४।।**

या स्तोत्राचे पठण केल्याने घोड्यांचा तबेला, हत्तीगृह, गायींचा गोठा या ठिकाणी असलेले दोष शांत होऊन महापातकांचा विनाश होतो.

**सर्वसौख्यकरं नृणामायुरारोग्यदं तथा ।**

**अगस्त्यमुनिना प्रोक्तं प्रजानां हितकाम्यया ।।३४।।**

अगस्त्य मुनींनी कथन केलेले हे स्तोत्र, सर्व मानवजातीला आयुरारोग्य, सर्वसुखे प्राप्त करून देणारे, कल्याणकारक आहे.

Lakshmi Stotram by Agastya (Lakshmistotram)

www.stutimandal.com / poemgen.phpqid=295

●●●





# आदित्यहृदयम् स्तोत्रमंत्र

## (वाल्मीकि रामायणे युद्धकाण्डे, १०७ सर्गः)

### (सार्थ मराठी)

अगस्त्य ऋषि हे सौरऊर्जेचा मानवी जीवनासाठी आवश्यक तेवढा उपयोग करणारे ऋषि होत. त्यांनी प्रभु रामचंद्रांना सांगितलेले आदित्यहृदय स्तोत्रमंत्र हा विश्वातील अतिशय शक्तिशाली असा मंत्र आहे. प्रत्यक्ष शक्ति प्रकटविण्यासाठी मंत्र सिद्ध केलेला असतो. मंत्र हा संथेच्या स्वरूपात गुरुमुखातून स्वीकारायचा असतो. अगस्त्यांनी विरचित केलेला व सिद्ध केलेला हा मंत्र वाल्मीकि रामायणात युद्धकांडातील १०७ व्या सर्गात

वाल्मीकींनी लिहिला आहे. मात्र तो अगस्त्यकृत आहे हे स्पष्ट आहे; कारण मंत्रसंहिता जशीच्या तशीच उल्लिखित करावी लागते. त्यामुळे हे मंत्रस्तोत्र मूळ स्वरूपात आपल्यासाठी उपलब्ध आहे. त्यातील मंत्रसामर्थ्य लक्षात घेऊन, संकटमुक्त होण्यासाठी विवेकाने आणि पूर्ण श्रद्धेने पठण केल्यास 'रामबाणा'प्रमाणे त्यातून अगस्त्यकृपेने फलनिष्पत्ती घडते.

**ततो युद्धपरिश्रान्तं समरे चिन्तया स्थितम् ।**
**रावणं चाग्रतो दृष्ट्वा युद्धाय समुपस्थितम् ।।१।।**

राम युद्धभूमीवर युद्धाने परिश्रांत झालेला, थकून गेलेला, सचिंत (चिंतामग्न) झालेला असताना, युद्धासाठी रावण, समोर उपस्थित झालेला पाहिला.

**दैवतैश्च समागम्य द्रुष्टमभ्यागतो रणम् ।**
**उपागम्याब्रवीद्राममगस्त्यो भगवान् ऋषिः ।।२।।**

ते पाहून तेजस्वी भगवान अगस्त्य ऋषि, देवदेवतांसह युद्धभूमीवर उपस्थित झाले. ते रामाला म्हणाले-

**राम राम महाबाहो शृणु गुह्यं सनातनम् ।**
**येन सर्वानरीन् वत्स, समरे विजयिष्यसि ।।३।।**

हे महाबाहो, पराक्रमी रामा, हे वत्सा, जे शाश्वत गुह्य तुला सांगतो ते तू काळजीपूर्वक ऐक. त्यामुळे तू समरांगणावर सर्व शत्रूंवर विजय मिळविशील.

**आदित्यहृदयं पुण्यं सर्वशत्रुविनाशनम् ।**
**जयावहं जपेन्नित्यमक्षयं परमं शिवम् ।।४।।**



आदित्यहृदय स्तोत्र सर्व शत्रूंचा विनाश करणारे आहे. या पवित्र स्तोत्राचा जप, त्याचे पठण नित्य केल्याने तुझे सदैव कल्याण होईल. (परम शिव होईल).

**सर्वमङ्गलमाङ्गल्यं सर्वपापप्रणाशनम् ।**
**चिन्ताशोकप्रशमनमायुर्वर्धन ।।५।।**

हे स्तोत्र सर्व मंगल करणारे, सर्व पापांचा (वाईट कृत्यांचा) विनाश करणारे, चिंता, शोक, दुःखाचे शमन (शांत) करणारे आणि दीर्घायुष्य देणारे अतिशय प्रभावी आहे. (अति उत्तम आहे).

**रश्मिमन्तं समुद्यन्तं देवासुरनमस्कृतम् ।**
**पूजयस्व विवस्वन्तं भास्करं भुवनेश्वरम् ।।६।।**

रश्मिवन्त, विवस्वान, विश्वाचा स्वामी, देवासुरांनाही पूजनीय असलेल्या अशा क्षितिजावर आलेल्या भास्कराला वंदन करावे.

**सर्वदेवात्मको ह्येष तेजस्वी रश्मिभावनः ।**
**एष देवासुरगणान् लोकान् पाति गभस्तिभिः ।।७।।**

हा सर्वदेवात्मक तेजस्वी रश्मिभावन (किरणांनी लक्षवेधक), गभस्ती देवासुरगणांसह सृष्टीतील सर्व जीवांचे पालनपोषण करतो, उर्जा देतो.

**एष ब्रह्मा च विष्णुश्च शिवः स्कन्दः प्रजापतिः ।**
**महेन्द्रो धनदः कालो यमः सोमो ह्यपांपतिः ।।८।।**

हा ब्रह्मा, विष्णू, शिव, कार्तिकेय, प्रजापति (ब्रह्मदेव), महेंद्र (इंद्र), कुबेर, काल, यम, सोम आणि वरुणही आहे.

**पितरो, वसवः साध्या ह्यश्विनौ मरुतो मनुः ।**

**वायुर्वह्निः प्रजाप्राण ऋतुकर्ता प्रभाकरः ॥९॥**

हाच पूर्वज, (अष्ट)वसु, सिद्धी (दाता), अश्विनीकुमार, मरुत, मनू, वायू, अग्नि, प्रजेचा प्राण, सहा ऋतूंचा कर्ता, (प्रकाश देणारा) प्रभाकर आहे.

**आदित्यः सविता सूर्यः खगः पूषा गभस्तिमान् ।**

**सुवर्णदृशो भानुर्हिरण्यरेता दिवाकरः ॥१०॥**

हा आदितीचा पुत्र (आदित्य), सविता, सूर्य, खग, पूषा, गभस्ति असा सुवर्णसदृश तेजस्वी भानु, दिवाकर या गुणनामांनीही प्रसिद्ध आहे.

**हरिदश्वः सहस्त्रार्चिः सप्तसप्ति–मरीचिमान् ।**

**तिमिरोन्मथनः शम्भुस्त्वष्टा मार्तण्ड अंशुमान् ॥११॥**

सातपट (अगणित) चैतन्यमयी असलेले सात अश्व सहस्त्रावधी किरणांच्या मरीचीला (सूर्याला) प्रकाशमान करतात (घेऊन येतात). त्यामुळे तिमिराचा नाश करणारा मार्तंड नावाचा त्वष्टा (सूत्रधार) अंशुमान (प्रकाशमान) होतो.

**हिरण्यगर्भः शिशिरस्तपनो भास्करो रविः ।**

**अग्निगर्भोऽदितेः पुत्रः शंखः शिशिरनाशानः ॥१२॥**

आदितीच्या अग्निगर्भापासून निर्माण झालेला हिरण्यगर्भ (सूर्य) आदितीपुत्र शंख, शिशिराला तापविणारा, शिशिराचा नाश करणारा तेजस्वी भास्कर, रवि आहे.



**व्योमनाथस्तमोभेदी ऋग्यजुस्सामपारगः ।**

**घनवृष्टिरपां मित्र विन्ध्यवीथीप्लवङ्गमः ॥१३॥**

तो नभोमंडळाचा स्वामी, तमाचा (अंधःकार नष्ट करणारा) भेद करणारा, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तीन वेदांचा अधिष्ठाता, दक्षिणेकडच्या विंध्य पर्वतातून घनवृष्टी करून जलप्रवाह नेणाऱ्या वरुणाचा तो मित्र आहे.

**आतपी मण्डली मृत्युः पिङ्गलः सर्वतापनः ।**

**कविर्विश्वो महातेजाः रक्तः सर्वभवोद्भवः ॥१४॥**

मंडलाकार, पिंगल (पिवळा), रक्तवर्णी असलेला, विश्वाला उर्जा प्रकाश देणारा, सर्व विश्वाचा आधार, विश्वाचा उद्भव (निर्मिती) करणारा तो महातेजस्वी विश्वकवि आहे.

**नक्षत्रग्रहताराणामधिपो विश्वभावनः ।**

**तेजसामपि तेजस्वी द्वादशात्मन्नमोऽस्तु ते ॥१५॥**

हे आदित्य, नक्षत्र, ग्रह, तारकांचा तू अधिपति, विश्वभावन (विश्वाला प्रिय) आहेस. तेजस्वी, बारा कला (बारा नावे) असलेल्या अशा तुला नमस्कार असो.

**नमः पूर्वाय गिरये पश्चिमायाद्रये नमः ।**

**ज्योतिर्गणानां पतये दिनाधिपतये नमः ॥१६॥**

पूर्वेकडील पर्वतांमधून उदयास येणाऱ्या, पश्चिमेकडे अस्तास जाणाऱ्या हे आदित्यदेवा, तुला नमस्कार असो. (ज्योतिगणांचा) तारकांचा अधिपती आणि दिवसाच्या अधिपती असलेल्या अशा तुला नमस्कार असो.

**जयाय जयभद्राय हर्यश्वाय नमो नमः ।**

**नमो नमः सहस्रांशो आदित्याय नमो नमः ।।१७।।**

सहस्रावधि किरणांचा स्वामी, (सहस्रांश), असलेल्या (आदितिपुत्र), आदित्याला नमस्कार असो. विजय, भरभराट प्राप्त करून देणाऱ्या अश्वारूढ आदित्याला नमस्कार असो.

**नम उग्राय वीराय सारङ्गाय नमो नमः ।**

**नमः पद्मप्रबोधाय मार्तण्डाय नमो नमः ।।१८।।**

उग्र, महापराक्रमी वीर, सारंगासम गतिमान असलेल्या आदित्याला नमस्कार असो. ज्याच्या दर्शनाने कमळे विकसित होतात त्या मृकुंड महर्षींच्या पुत्राला, मार्तंडाला नमस्कार असो.

**ब्रह्मेशानाच्युतेशाय सूर्यायादित्यवर्चसे ।**

**भास्वते सर्वभक्षाय रौद्राय वपुषे नमः ।।१९।।**

तेजस्वी ब्रह्मा, शिव, विष्णू, सूर्य, आदित्यास नमस्कार असो. सर्वांचा ग्रास करणाऱ्या रुद्र रूपाला नमस्कार असो.

**तमोघ्नाय हिमघ्नाय शत्रुघ्नायामितात्मने ।**

**कृतघ्नघ्नायतदेवाय ज्योतिषां पतये नमः ।।२०।।**

तिमिराचा नाश करणारा, अंधःकार नाहीसा करणारा, हिम, धुके, बर्फ या शत्रूंचा समूळ नाश करणारा, अमित (असीम आकारमान असलेला), कृतघ्नांचा सर्वनाश करणारा, तारकांचा स्वामी अशा आदित्याला नमस्कार असो.



**तप्तचामीकराभाय वह्नये विश्वकर्मणे ।**

**नमस्तमोऽभिनिघ्नाय रुचये लोकसाक्षिणे ।।२१।।**

तप्त सोन्याप्रमाणे प्रकाशणारा, अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करणारा, विश्वाचा शिल्पकार असलेल्या, लोकसाक्षी स्वामी आदित्यास नमस्कार असो.

**नाशयत्येष वै भूतं तदेव सृजति प्रभुः ।**

**पायत्येष तपत्येष वर्षत्येष गभस्तिभिः ।।२२।।**

आपल्या तेजस्वी किरणांनी उष्णता निर्माण करतो, विश्वातील सर्व जीवांची उत्पत्ति, पालन आणि विनाश करतो, त्याचे तप्त किरण पाणी तापवितात आणि पाऊस निर्माण करतात (त्या आदित्यास नमस्कार असो.)

**एष सुप्तेषु जागर्ति भूतेषु परिनिष्ठतः**

**एष एवाग्निहोत्रं च फलं चैवाग्निहोत्रिणाम् ।।२३।।**

हा सर्व जीवांना निद्रेतून जागवितो. हाच अग्निहोत्र आहे आणि अग्निहोत्र्यांना मिळणारे फलही आहे.

**वेदाश्च क्रतवश्चैव क्रतूनां फलमेव च ।**

**यानि कृत्यानि लोकेषु सर्व एष रविः प्रभुः ।।२४।।**

रवी हाच वेद (वेदांचे उगमस्थान) आहे. हाच यज्ञ आहे, यज्ञाचे फलही हाच आहे; विश्वातील सर्व क्रियांचा (घटनांचा) तोच प्रभु आहे.

## – फलश्रुति –

**एनमापत्सु कृच्छ्रेषु कान्तारेषु भयेषु च ।**

**कीर्तयन् पुरुषः कश्चिन्नावसीदति राघव ।।२५।।**

हे राघवा, संकटाने त्रस्त झालेल्या, अरण्यात एकाकी भयग्रस्त झालेल्या एखाद्या पुरुषाने (व्यक्तीने) सूर्यदेवांचे गुणगान केले तर तो दुःखमुक्त होतो. (खचत नाही. बसत नाही.)

**पूजयस्वैनमेकाग्रे देवदेवं जगत्पतिम्**

**एतत् त्रिगुणितं जप्त्वा युद्धेषु विजयिष्यसि ।।२६।।**

तू या देवाधिदेव, जगत्पति आदित्याचे पूजन करून, स्तोत्राचे एकाग्रतेने तीनदा पठण केलेस तर तू युद्धात विजयी होशील.

**अस्मिन् क्षणे महाबाहो रावणं त्वं वधिष्यसि ।**

**एवमुक्त्वा तदाऽगस्त्यो जगाम च यथागतम् ।।२७।।**

हे महाबाहो, ह्या क्षणी रावणाचा तू वध करशील; असे त्यास (रामास) म्हणून अगस्त्य ऋषींनी निरोप घेतला. (निघून गेले). जसे आले तसे.

**एतच्छ्रुत्वा महातेजा नष्टशोकोऽभवत्तदा ।**

**धारयामास सुप्रीतो राघवः प्रयतात्मवान् ।।२८।।**

हे ऐकल्यानंतर, महातेजस्वी राघवांचा शोक, चिंता नष्ट झाली आणि अतिशय आनंदाने (महर्षी अगस्त्यांची) आज्ञा धारण केली आणि राम सिद्ध झाला.



**आदित्यं प्रेक्ष्य जप्त्वा तु परं हर्षमवाप्तवान् ।**

**त्रिराचम्य शुचिर्भूत्वा धनुरादाय वीर्यवान् ।।२९।।**

शुचिर्भूत होऊन, तीनदा आचमन करून, आदित्याचे दर्शन घेऊन; आदित्यहृदय स्तोत्राचे अतिशय आनंदाने (तीनदा) पठण करून; वीर्यवान् राघवाने धनुष्य उचलले.

**रावणं प्रेक्ष्य हृष्टात्मा युद्धाय समुपागमत् ।**

**सर्वयत्नेन महता वधे तस्य धृतोऽभवत् ।।३०।।**

रावणाला युद्धासाठी समोर आलेला पाहून, अतिशय उल्हसित होऊन रामाने त्याचा प्रयत्नपूर्वक वध करण्याचा निश्चय केला.

**अथ रविरवदन्निरीक्ष्य रामं मुदितमनाः परमं प्रहृष्यमाणः ।**

**निशिचरपतिसंक्षयं विदित्वा सुरगणमध्यगतो वचस्त्वरेति ।।३१।।**

रावणाचा अंतकाळ (नाश) जवळ आला आहे हे ओळखून, राम युद्धास सज्ज झाला आहे असे पाहून, आदित्यदेव सर्व देवांसह अवकाशात प्रकट झाले. त्वरा कर असे म्हणून त्या सर्वांनी अतिशय आनंदाने रामाला प्रोत्साहित केले.

।। हा आदित्यहृदय मंत्र होय।।

https:wn.com / शत्रुविनाशक आदित्य हृदय स्तोत्र महर्षि अगस्त्य विरचित : अगस्त्यांनी रावणाशी युद्ध करतेसमयी श्रीरामांना शिकविले. रामायण युद्धकाण्ड (Books) Canto/07 अगस्त्यांनी सांगितले आणि वाल्मीकींनी पूर्ण केले असे म्हटले जाते. / (www.cg song com cg Mp3) (ww.you2repeat.com/watch/?v=LUnCy66w864)

●●●



# अगस्त्यकृत महालक्ष्मीस्तुति

## (अष्टपदी)

मातर्नमामि कमले कमलायताक्षि ।
श्रीविष्णुहृत्कमलवासिनि विश्वमातः ।
क्षीरोदजे कमलकोमलगर्भगौरि ।
लक्ष्मी प्रसीद, सततं नमतां शरण्ये ।।१।।



त्वं श्रीरुपेन्द्रसदने मदनैकमात–
ज्योंत्स्नासि चन्द्रमसि चन्द्रमनोहरासि ।
सूर्ये  प्रभासि च जगत्त्रितये प्रभासि
लक्ष्मि प्रसीद सततं नमतां शरण्ये ।।२।।
त्वं जातवेदसि सदा दहनात्मशक्ति–
– र्वेधास्त्वया जगदिदं विविधं विदध्यात् ।
विश्वम्भरोऽपि बिभूयादखिलं भवत्या
लक्ष्मि प्रसीद, सततं नमतां शरण्ये ।।३।।
त्वत्यक्तमेतदमले हरते हरोऽपि
त्वं पासि हंसि विदधासि परावरासि ।
ईड्यो बभूव हरिरप्यमले त्वदाप्त्या
लक्ष्मि प्रसीद, सततं नमतां शरण्ये ।।४।।
शूरः सः एव स, गुणी, स बुधः स धन्यो
मान्यः स एव कुलशीलकलाकलापैः ।
एकः शुचिः स हि पुमान् सकलेऽपि लोके
यत्रापतेत्तव शुभे करुणाकटाक्षः ।।५।।
यस्मिन्वसेः क्षणमहो पुरुषे गजेऽश्वे
स्त्रैणे तृणे सरसि देवकुले गृहेऽन्ने ।
रत्ने पतत्रिणि पशौ शयने धरायां
सश्रीकमेव सकले तदिहास्ति नान्यत् ।।६।।
त्वत्स्पृष्टमेव सकलं शुचितां लभेत
त्वत्त्यक्तमेव  सकलं त्वंशुचीह लक्ष्मि ।

**त्वन्नाम यत्र च सुमङ्गलमेव तत्र**
**श्रीविष्णुपत्नि कमले कमलालयेऽपि ।।७।।**
**लक्ष्मीं श्रियं च कमलां कमलालयां च**
**पद्मां रमां नलिनयुग्मकरां च मां च ।**
**क्षीरोदजाममृतकुम्भकरामिमां च**
**विष्णुप्रियामिति सदा जपता क्व दुःखम् ।।८।।**

(काशी. पूर्वा. ५.८०-८७)

## भावानुवाद

कमलाप्रमाणे विशाल नेत्र असलेली माता, कमला, मी आपणांस प्रणाम करतो. आपण भगवान विष्णूंच्या हृदयकमलात निवास करणारी सर्व विश्वाची जननी आहात. कमलाच्या कोमल गर्भाप्रमाणे गौर वर्णाची क्षीरसागराची पुत्री महालक्ष्मी, आपण आपणांस शरण आलेल्या प्रणतजनांचे पालन करणाऱ्या आहात. आपण सदा मजवर प्रसन्न असावे. मदनाची एकमात्र जननी, रुक्मिणीरूपधारिणी लक्ष्मी, आपण भगवान विष्णूंच्या वैकुंठधामात 'श्री' या नावाने प्रसिद्ध आहात. चंद्रासारख्या प्रसन्न मुखाच्या देवी, आपणच चंद्राचे चांदणे आहात. सूर्याची प्रभा आहात. तिन्ही लोकांना आपणच प्रभावित करता. प्रणतजनांना आश्रय देणारी माता लक्ष्मी, आपण माझ्यावर सदा प्रसन्न असावे.

आपणच अग्नीतील दाहक शक्ति आहात. ब्रह्मदेव आपल्या साह्याने विविध प्रकारच्या जगताची रचना करतात. सर्व विश्वाचे भरणपोषण करणारे विष्णू आपल्या आधारानेच सर्वांचे पालन करतात. शरण येऊन चरणांवर वाकणाऱ्या पुरुषांचे निरंतर रक्षण करणाऱ्या माते, महालक्ष्मी, आपण माझ्यावर प्रसन्न व्हावे. निर्मल स्वरूपाच्या देवी, ज्याला आपण



सोडून दिले आहे, त्याचा भगवान रुद्र संहार करतात. वास्तवात आपणच जगताचे पालन, संहार व निर्मिति करता. आपणच कार्यकारणरूप जगत आहात. निर्मळस्वरूपा लक्ष्मी, आपणांस प्राप्त करूनच भगवान श्रीहरि सर्वांना पूज्य झाले आहेत.

माते, आपण प्रणतजनांचे सदैव पालन करणारे आहात. माझ्यावर प्रसन्न व्हावे. शुभे, ज्या पुरुषावर आपला करुणापूर्ण कटाक्षपात होतो, तोच जगतात एकमात्र शूरवीर, गुणवान, विद्वान, धन्य, मान्य, कुलीन, शीलवान, अनेक कलांचा ज्ञाता आणि परम पवित्र मानला जातो. देवी, आपण ज्या कोणत्या पुरुषात, हत्तीत, घोड्यात, नपुंसकात, तृणात, सरोवरात, देवमंदिरात, गृहात, अन्नात, रत्नात, पशुपक्ष्यात, शय्येत, भूमीवर क्षणमात्र निवास करता, समस्त जगात त्यासच शोभा प्राप्त होते. इतरास नाही.

विष्णुपत्नी, कमले, कमलालये, माते लक्ष्मी, आपण ज्याला स्पर्श केला आहे, ते पवित्र होते. आपण ज्याचा त्याग केला आहे, ते सर्व या जगात अपवित्र ठरते. जेथे आपले नाव आहे, ते उत्तम व मंगल ठरते. जो लक्ष्मी, श्री, कमला, कमलालया, पद्मा, रमा, नलिनयुग्मकरा, माता, क्षीरोदजा, अमृतकुंभकरा, इरा, विष्णुप्रिया; या नामांनी आपला सदा जप करतो, त्याला दुःख आहे तरी कोठे?

(स्कंदपुराण (उत्तरार्ध) संपा. डॉ. प्र. न. जोशी, प्रसाद प्रकाशन, पुणे, शके १९०५ यांच्या सौजन्याने)

●●●







# श्रीललितासहस्त्रनामस्तोत्र

श्रीमाता, श्री महाराजी श्रीमत्सिंहासनेश्वरी ।
चिदग्निकुण्डसम्भूत देवकार्य समुद्दता ।।१।।
अद्दद्रानु सहस्त्राभा, चतुर्बाहुसमन्विता ।
रागस्वरूपपाशाढ्या, क्रोधाकारङ्कुशोज्वला ।।२।।
मनोरुपेक्षुकोदण्डापञ्चतन्मात्रसायका ।
निजारुणप्रभापूरमज्जद्–ब्रह्माण्डमण्डला ।।३।।
जम्पकाशोक पुन्नाग सौगन्धिक लसत्कचा ।
कुरुविन्दमणि श्रेणी कनतकोटीरमण्डिता ।।४।।
अष्टमीचन्द्र विभ्राजदलिकस्थलशोभिता ।
मुखचन्द्रकलङ्काभमृगनाभिविशेषका ।।५।।
वदनस्मर माङ्गल्यगृहतोरणचिल्लिका ।
वक्त्रलक्ष्मी परिवाहचलन्मीनाभलोचना ।।६।।
नवचम्पक पुष्पाभ नासादण्डविराजिता ।
ताराकान्तितिरस्कारि नासाभरणभासुरा ।।७।।
कदम्बञ्जरीक्लृप्तकर्णपूरमनोहरा ।
ताटङ्कयुगलीभूत तपनोडुपमण्डला ।।८।।
पद्मरागशिलादर्श परिभावि कपोलभूः ।
नवविदुमबिम्बश्री न्यक्कारिरदर्शनच्छदा ।।९।।
शुद्धविद्दाङ्कुराकार द्विजपंक्ति द्वयोज्वला ।

कर्पूरवीटिकामोदसमाकर्षि दिगन्तरा ।।१०।।
निजसंलापमाधुर्यविनिर्भर्त्सित कच्छपी ।
मंदस्मितप्रभापूरमज्जत्कामेशमानसा ।।११।।
अनाकलितसादृश्यं, चिबुकश्री विराजिता ।
कामेश बद्धमाङ्गल्यसूत्रशोभितकन्धरा ।।१२।।
कनकांगद केयूर, कमनीयभुजान्विता ।
रत्नग्रैवेय चिन्ताकलोल मुक्ता फलान्विता ।।१३।।
कामेश्वरप्रेमरत्न मणिप्रतिपणस्तनी ।
नाभ्यालवालरोमालि लताफलकुचद्वयी ।।१४।।
लक्ष्यरोम लताधारता समुन्नेयमध्यमा ।
स्तनभारदलन्मध्यपट्टबन्धवलित्रया ।।१५।।
अरुणारुणकौसुंभं वस्त्रं, भास्वत् कटितटी ।
रत्नकिंकिणिंका रम्यरशनादामभूषिता ।।१६।।
कामेश, ज्ञातसौभाग्य मार्दवोरुद्वयान्विता ।
माणिक्यमुकुटाकारजानुद्वयविराजिता ।।१७।।
इन्दगोपपरिक्षिप्त स्मरतूणाभजंघिका ।
गूढगुल्फा कूर्मपृष्ठ जयिष्णु प्रपदान्विता ।।१८।।
नखदीधितीसंछन्ननमज्जनतमोगुण ।
पदद्वयं प्रभाजालपराकृतसरोरुहा ।।१९।।
सिजानमणिमञ्जरीमण्डितश्रीपदाम्बुजा ।
मराली मन्दगमना महालावण्यशेवधिः ।।२०।।
सर्वारुणाऽनवद्यांगी सर्वाभरणभूषिता ।



शिवकामेश्वरांकस्था शिवा स्वाधीनवल्लभा ।।२१।।
सुमेरु मध्यश्रृङ्गस्था, श्रीमन्नगरनायिका ।
चिन्तामणिग्रहान्तस्था, पंचब्रहमासनस्थिता ।।२२।।
महापद्माटवी संस्था कदंबवनवासिनी ।
सुधासागरमध्यस्था कामाक्षी कामदायिनी ।।२३।।
देवर्षिगणसंघातस्तूयमानात्मवैभवा ।
भंडासुरवधोद्युक्त शक्तिसेनासमन्विता ।।२४।।
संपत्करी समारुढसिंधुर व्रजसेविता ।
अश्वारुढाधिष्ठिताश्व कोटिकोटिभिरावृता ।।२५।।
चक्रराजरथारुढसर्वायुधपरिष्कृता ।
गेयचक्रं रथारुढं मंत्रिणि परिसेविता ।।२६।।
किरिचक्रंरथारुढ दण्डनाथापुरस्कृता ।
ज्वालामालिनिकाक्षिप्तवह्निप्राकारमध्यमा ।।२७।।
भण्डसैन्यवधोद्युक्तभक्तिविक्रमहर्षिता ।
नित्या पराक्रमाटोप निरीक्षणसमुत्सुका ।।२८।।
भण्डपुत्रवधोद्युक्तबाला विक्रमनंदिता ।
मन्त्रिण्यबाविरचितविषंग वधतोषिता ।।२९।।
विशुक्रप्राणहरणवासहि वीर्यनंदिता ।
कामेश्वरमुखालोककल्पित श्रीगणेश्वरा ।।३०।।

## ललिता सहस्रनाम

या सहस्रनाम स्तोत्राचे सामर्थ्य फार मोठे आहे. देवीचे जे भक्त आहेत त्यांनी नित्य हे स्तोत्र म्हणावे/वाचावे अगर ऐकावे. मनःशांति तर लाभतेच शिवाय आत्मज्ञान होऊन अंती मुक्तिही लाभते. मात्र वाचन शुद्ध व न्यासयुक्त असावे. ज्यांना हे स्तोत्र रोज म्हणणे शक्य नसेल त्यांनी २२ जून व २२ डिसेंबरला (वर्षातील सर्वांत लहान व सर्वांत मोठा दिवस), आपली जन्मतिथि, शुद्ध अष्टमी, चतुर्दशी आणि पौर्णिमेस जरुर म्हणावे/वाचावे अगर ऐकावे. या स्तोत्रांत रोगनाश करण्याची फार मोठी शक्ति आहे. घरांतील आजारी व्यक्तीसाठी भस्म हातांत घेऊन हे म्हणावे आणि नंतर ते भस्म आजारी व्यक्तीच्या कपाळावर लावावे. हृदयविकारावर तर हे स्तोत्र फार प्रभावी आहे.

Shiv Lalita Sahasra Nam Stotram Part 10 6

ब्रह्मांडपुराणात उत्तराखंडात हयग्रीव-अगस्त्य संवादात हे स्तोत्र प्रकटले.

https//www.google.com / search - agastya + virachit + stotras & 09 = chrom.

Lalitha sahasranam : simple translation and explanation.

https:www.facebook com / 346493315387882

हयग्रीवांनी अगस्त्यांना प्रदान केले.

(निरनिराळ्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) अगस्त्य-हयग्रीव संवादातून प्रकटलेल्या श्लोकांची संख्या आणि स्वरूप वेगवेगळे पहायला मिळते. सार्थ सहस्रनामही उपलब्ध आहे. जिज्ञासूंनी ते पहावे.)

●●●





# लोपामुद्राप्रोक्तम् श्रीलक्ष्मीस्तोत्र

## ।। पूर्व पीठिका ।।

**लोपामुद्राश्रिया: पादौ धृत्वा ननाम सादरम् ।**
**ववन्दे स्तवनं चक्रे, तव लक्ष्मि सदा सती ।।१।।**

श्रुणु तत् स्तवनं येन स्तावकाः स्युर्धनाश्रयाः ।
नैकसम्पत्समायुक्ताः त्वया प्रसन्नयेक्षिताः ।।२।।

॥ मूलपाठ श्रीलोपामुद्रा उवाच ॥

मातर्नमामि कमले पद्मायतसुलोचने ।
श्रीविष्णुहृत्कमलस्थे विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।१।।

क्षीरसागरसत्पुत्रि पद्मगर्भाभसुन्दरि ।
लक्ष्मि प्रसीद सततं विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।२।।

महेन्द्रसदने त्वं श्रीः, रुक्मिणि कृष्णभामिनि ।
चन्द्रे ज्योस्त्ना, प्रभा सूर्ये, विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।३।।

स्मितानने जगद्धात्रि शरण्ये सुखवर्द्धिनि ।
जातवेदसि दहने, विश्वामातर्नमोऽस्तु ते ।।४।।

ब्रह्माणि त्वं सर्जनाऽसि विष्णौ त्वं पोषिका सदा ।
शिवौ संहारिका शक्तिः विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।५।।

त्वया शूरागुणीविज्ञा धन्यामान्याकुलीनका ।
कलाशीलकलापाढ्यै विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।६।।



त्वया गजस्तुरङ्गश्च स्त्रैणस्तूर्ण सरः सदः ।
देवो गृहं कणः श्रेष्ठा विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।७।।

त्वया पक्षीपशुः शय्या रज्नं पृथ्वी नरो वधूः ।
श्रेष्ठा शुद्धा महालक्ष्मि विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।८।।

लक्ष्मि श्रि कमले पद्मे रमे पद्मोद्भवे सति ।
अब्धिजे विष्णुपत्नि त्वं प्रसीद् सतत् प्रिये ।।९।।

॥ फलश्रुतिः ॥

इति स्तुता प्रसन्ना च श्रीरुवाच पतिव्रताम् ।
लोपामुद्रे, मुने, जाने वां यत–हृत्तापकारणम् ।।१।।

सुचेतन दुनोत्येव काशीविश्लेषजोऽनलः ।
युवा वाराणसीं प्राप्य सिद्धिं प्राप्य ईप्सिताम् ।।२।।

ये पठिष्यन्ति मत्स्तोत्रं तापदारिद्र्यानाशकम् ।
इष्टसम्पत्प्रदं तेषां जयसन्ततिराकारकम् ।।३।।

**मम सान्निध्यदं बालग्रहादिव्यधिनाशनम् ।**
**भविष्यति मम सारुप्यादिप्रमोक्षणं तथा ।।४।।**

## ।। श्रीलक्ष्मीनारायणसंहितायां श्रीलोपामुद्राकृत–श्रीलक्ष्मीस्तोत्रम् ।।

https://sansktirdocuments.org/sanskrit/Lamshmi ITX
लक्ष्मीस्तोत्रं  लोपामुद्राप्रोक्तम्

●●●



आनन्दोत्सवकार्ये समर्पितात्मानः सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे महोदयाः । नित्यनूत्नत्वेन उपक्रमशालिन्यः कार्योत्साहपराः । ताभिः स्व. समादरणीनां । महर्षि–अगस्त्यानां स्तोत्राणां सानुवादं ससंदर्भं सम्पादनं कृतं स्तोत्ररत्नमञ्जूषा इति । सर्वथा अभिनन्दनार्ह अभिमानार्ह च कार्यं निर्दोषप्रायं मुद्रणं, समुचितोऽनुवादः योग्यसंदर्भाः सन्ति शोधवृत्त्या सर्वं संप्रस्ततम् । स्वागतार्हो प्रयासः । स सर्वच वर्धत्तां, सर्वथा यशोत्कर्षकरं तिष्ठतु । सानुषङ्गाति कल्याणानि सन्तु ।

क्रांतिकारी, समाजहितैषी अगस्त्य दक्षिणेत पोचलेले ज्ञान–कर्म–भक्तिपूर्ण जीवन जगणारे व सर्वांना प्रेरणा देणारे महामानव. त्यांची पत्नी प्रसन्न, रसाळ  व प्रभावी स्तोत्रे ह्या स्तोत्रमञ्जूषेमध्ये सरस, सहज, सरल रीतीने संशोधनवृत्ति संभाळून, सुन्दर रीतीने प्रस्तुत केली आहेत हे कौतुकास्पद आहे. संहिता, अनुवाद व संदर्भ योग्य रीतीने आहेत. संहिता निर्दोषप्राय, अनुवाद सहज व सरळ असून उत्तम संदर्भ आहेत. सौ. उषाताईंचे अभिनन्दन व आनंदोत्सव कार्यास शुभेच्छा! धन्यवाद! सर्वत्र वर्धन्ताम !

**उषःकाल होता होता, संशोधनपर्वे सजली ।**
**आता पुन्हा वाजवा, उषानिलांच्या तुतारी ।।**

